■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस




मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343

R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक २३ ● मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रु.


## अंधाऱ्या जीवनात प्रकाश फुलवणारे कार्य : स्व. सिंधुताई वाघमारे यांचे मरणोत्तर नेत्रदान

वाशिम (जिमाका) - रिसोड येथील स्थानिक रहिवासी संतोष वाघमारे यांच्या मातोश्री स्व. सिंधुताई पुरुषोत्तम वाघमारे (वय ८१ वर्षे) यांचे दि. २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.५० वाजता निधन झाले. त्यांच्या निधनाने वाघमारे कुटुंबासह परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

कुटुंबातील आधारस्तंभ, सर्वांना सोबत घेऊन चालणाऱ्या आणि समाजकार्याची आवड असलेल्या स्व. सिंधुताई यांच्या निधनानंतरही वाघमारे परिवाराने अत्यंत प्रेरणादायी निर्णय घेतला – मरणोत्तर नेत्रदानाचा.

दुःखाच्या या प्रसंगातही दोन अंधांच्या जीवनात प्रकाश निर्माण व्हावा या उदात्त हेतूने वाघमारे कुटुंबीयांनी नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार जिल्हा सामान्य रुग्णालय, वाशिम येथे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अति. जिल्हा



शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी, नेत्र शल्यचिकित्सक डॉ. आशिष बेदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्र चिकित्सा अधिकारी सुधिर साळवे, नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे व संदीप पोफळे यांनी स्व. सिंधुताई यांचे नेत्र काढले. काढलेले नेत्र त्याच दिवशी वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे नेण्यात आले. या मानवसेवेच्या कार्यासाठी वाघमारे कुटुंबीयांचे सहकार्य व पुढाकार कौतुकास्पद ठरले आहे.

### समाजातील प्रत्येकाने या नेत्रदान चळवळीत सक्रीय सहभाग घ्यावा

मृत्यूनंतर आपल्या जवळच्या व्यक्तीचे नेत्रदान घडवून आणावे आणि नेत्रदानानंतरच अंतिम संस्कार करावेत, जेणेकरून अधिकाधिक अंधांच्या जीवनात उजेड निर्माण होईल.

**जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे**

नेत्रदानासाठी संपर्क : ९९२२५१९९४८
(जिल्हा रुग्णालय, वाशिम)

## काटेपूर्णा अभयारण्यात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा संपन्न

**वाशिम (जिमाका) – जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आणि स्वामी विवेकानंद आपत्ती व्यवस्थापन पथक यांच्या संयुक्त विद्यमाने काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्यात आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.**

कार्यशाळेदरम्यान जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहु भगत यांनी पथकातील सदस्यांना मार्गदर्शन केले.

आपत्तीच्या वेळी शांतता आणि सतर्कता या दोन्हीही अत्यावश्यक असतात. घरगुती किंवा नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास उपलब्ध साधनांचा योग्य वापर करून तात्काळ उपाययोजना करणे गरजेचे आहे. तसेच आपत्तीग्रस्तांना मदत करताना प्राथमिक उपचारांची योग्य पद्धत, तसेच आपत्कालीन हेल्पलाईनचा कार्यक्षम वापर याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. युवकांनी ठरवले तर ते क्रांती घडवू शकतात. मंगरुळपीर तालुक्यातील या पथकाच्या कामामुळे आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात एक नवी क्रांती घडेल. असे ते यावेळी म्हणाले. या प्रसंगी पथकाचे समन्वयक किशोर देशमुख, सचिन राणे, काटेपूर्णा अभयारण्याचे वनरक्षक प्रविण कांबळे, माजी सैनिक विशाल बारड, तसेच विनोद पवार, मोहनराव साबळे, संतोष कुटे, राहुल साखरे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पथकातील सर्व सदस्यांनी मनपूर्वक परिश्रम घेतले.

## आता तीन हेक्टरपर्यंतचे बाधित क्षेत्र; ६४८ कोटी १५ लक्ष ४१ हजार रुपयांच्या निधी वितरणाला मान्यता

मुंबई, दि. २१: यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून या बाधित शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे. अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत व्हावी म्हणून राज्य शासनाने तातडीने मदत देण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी दोन हेक्टरपर्यंत मदत देण्यासाठी मान्यता दिली असून आता या शेतकऱ्यांना ३ हेक्टरपर्यंतच्या बाधित क्षेत्रासाठीही विशेष बाब म्हणून ६४८ कोटी १५ लाख ४१ हजार रुपयांच्या निधीच्या वितरणाला मान्यता देण्यात आली असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.या बाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आला आहे. आजपर्यंत मदत व पुनर्वसन विभागाकडून यंदाच्या खरीप हंगामातील नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना सुमारे ८१३९ कोटी रुपये इतक्या रकमेचे शासन निर्णय निर्गमितछ करण्यात आले आहेत, अशी माहितीही मंत्री श्री. जाधव पाटील यांनी यावेळी दिली.

मंत्री श्री. पाटील म्हणाले, राज्य शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे राज्यातील सहा लाख ५६ हजार ३१०.८३ हेक्टर क्षेत्रातील बाधित पिकांच्या नुकसानीपोटी सहा लाख १२ हजार १७७ शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. यापूर्वी या शेतकऱ्यांना दोन हेक्टर पर्यंत मदत मंजूर करण्यात आली होती, तर आता अतिरिक्त एक हेक्टरसाठी ही वाढीव मदत देण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे बाधित शेतकऱ्यांना मोठा आधार दिलासा मिळणार असल्याचा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी व्यक्त केला

छत्रपती संभाजीनगर विभाग- बीड, लातूर, परभणी, छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, नांदेड या जिल्ह्यातील तीन लाख ५८ हजार ६१२ शेतकऱ्यांच्या तीन लाख ८८ हजार १०१.१३ हेक्टर क्षेत्रातील पिकांच्या नुकसानीपोटी ३४६ कोटी ३१ लाख ७० हजार रुपये.

नागपूर विभाग- नागपूर, चंद्रपूर , वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्यातील तीन हजार ९३१ शेतकऱ्यांच्या सात हजार ६९८.२५ हेक्टर क्षेत्रातील पिकांच्या नुकसानीपोटी सात कोटी ५१ लाख ७५ हजार रुपये.

नाशिक विभाग - नाशिक, जळगाव आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील ५३ हजार ८६५ शेतकऱ्यांच्या ५० हजार ६२९ हेक्टर क्षेत्रातील पिकांच्या नुकसानीपोटी ५९ कोटी ३६ लाख १३ हजार रुपये. अमरावती विभाग - अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम जिल्ह्यातील एक लाख ७ हजार ६१५ शेतकऱ्यांच्या एक लाख ३९ हजार ४३८.२३ हेक्टर क्षेत्रातील पिकांच्या नुकसानीपोटी १३१ कोटी ५६ लाख ४७ हजार रुपये.

## स्वर, संगीत आणि कलेच्या तेजाने उजळली वाशिम नगरी !

### ■ विठ्ठलवाडी सभागृहात बहारदार गीत-संगीत सोहळ्यास रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ■

**वाशिम, दि. २३ ऑक्टोबर (जिमाका) – सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यावतीने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर रसिकांची दिवाळी स्वर आणि संगीतातून उजळावी या संकल्पनेतून 'दीपोत्सव' हा बहारदार गीत–संगीतमय सांस्कृतिक कार्यक्रम विठ्ठलवाडी सभागृह, वाशिम येथे मोठ्या उत्साहात पार पडला. सायंकाळी ६:४० वाजता दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी आकाशवाणी ज्येष्ठ पत्रकार सुनील कांबळे, रितेश देशमुख, समाजभूषण पुरस्कारप्राप्त कवी–गायक प्रज्ञानंद भगत, शाहीर संतोष खडसे, सामाजिक कार्यकर्ते नारायण सरकटे, तसेच सांस्कृतिक कार्य संचालनालय, छत्रपती संभाजीनगरचे सहाय्यक संचालक कार्यालयीन समन्वयक सचिन पाईकराव यांच्याहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.**




#### राज्यस्तरीय संकल्पना : वाशिममध्ये उत्साही प्रतिसाद

या उपक्रमामागे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांची संकल्पना असून, सचिव किरण कुलकर्णी (भाप्रसे), संचालक विभीषण चवरे, व सहाय्यक संचालक संदीप बलखंडे यांचे मार्गदर्शन लाभले. सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या माध्यमातून दिवाळी निमित्त राज्यभरात आयोजित या कार्यक्रमांद्वारे लोककला आणि मराठी गीतसंस्कृतीचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करण्यात आले आहे.

#### गायक-कलावंतांनी रंगवली सुरेल सायंकाळ

वाशिमच्या 'दीपोत्सवा'त प्रसिद्ध गायक मयूर सुकाळे (मुंबई), कुणाल वराळे (छ. संभाजीनगर), गायिका पौर्णिमा कांबळे आणि स्थानिक कलावंत शाहीर संतोष खडसे यांनी एकापेक्षा एक सुरेल गीतांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. संगीत, अभंगवाणी आणि मराठी गीतांच्या संगमातून दिवाळीचा हा सुरेल सोहळा रसिकांच्या हृदयात घर करून गेला.

#### सूत्रसंचालन आणि संयोजन

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रसिद्ध निवेदक तथा कवी प्रा. भास्कर पाईकराव यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रुपेश पुंडगे, सदानंद इंगोले, आशित खडसे आणि सुमेध इंगोले यांनी विशेष परिश्रम घेतले.

#### लोककलेचा दिवाळी दीप

वाशिमच्या विठ्ठलवाडी सभागृहात 'दीपोत्सव'मुळे दिवाळीच्या झगमगत्या प्रकाशात स्वर, शब्द आणि कलेचा अनोखा संगम खुलला. मराठी गीत, संगीत, अभंगवाणी आणि लोककलेचा हा सुरेल मिलाफ वाशिमच्या रसिकांसाठी अविस्मरणीय ठरला.

#### सुरेल सुरांनी उजळली सायंकाळ

गायिका पौर्णिमा कांबळे यांनी 'मोगरा फुलला' आणि 'शरद सुंदर रात्री' या गीतांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले, तर मयूर सुकाळे यांनी 'बघ उघडून दार' हे गीत सादर करून दाद मिळवली. कार्यक्रमात भक्तीगीत, भावगीत आणि चित्रपट संगीताच्या सुरेल उधळणीने सभागृह दुमदुमून गेले.

संगीत साथीसाठी ऑक्टोपॅडवर अमित निर्मळ, कीबोर्डवर विजय मेमरोट व कुणाल वानखेडे, तबल्यावर गणेश चव्हाण, ढोलकावर अनिकेत गवळी, तसेच सहगायक म्हणून स्वप्निल जाधव आणि अमोल साळवे यांनी उत्तम साथ दिली.

# गुन्हे आणि गुन्हेगार

सातारा जिल्ह्यातील फलटण येथील एका डॉक्टर महिलेवर अत्याचार करून तिला आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा विषय सध्या गाजत आहे. या विषयामध्ये एका पोलीस अधिकार्याचा समावेश असल्यामुळे त्याला गांभीर्य निश्चितच प्राप्त झाले आहे. पण गेल्या काही दिवसांमध्ये घडलेल्या इतर विविध घटनांवर नजर टाकली तर गुन्हे आणि गुन्हेगार यांची हिंसक आणि विकृत मानसिकता प्रकर्षाने समोर येताना दिसत आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एका बापाने आपल्या १४ वर्षीय मुलीचेच लैंगिक शोषण केल्याची घटना नुकतीच घडली आहे. बुलढाणा जिल्ह्यामध्ये एका पित्याने किरकोळ कारणावरून पत्नीशी भांडण झाल्याने त्याचा राग मनात धरून आपल्या दोन जुळ्या मुलींची गळा चिरून हत्या केली. पिंपरी चिंचवड शहरामध्ये राजकारणामध्ये कार्यरत असलेल्या एका नेत्याने नगरसेवक होऊ पाहणार्या आपल्या पत्नीचीही हत्या केल्याची घटना नुकतीच समोर आली आहे. केवळ महाराष्ट्रातील घडणार्या घटना समोर येत असल्या तरी देशाच्या कानाकोपर्यात अनेक ठिकाणी अशा प्रकारचे गुन्हे सातत्याने घडत असतात. फलटण येथे घडलेल्या आत्महत्येच्या प्रकारामुळे कायदा व सुव्यवस्थेच्या विषयावर बोट जरी ठेवण्यात येत असले, तरी अशा प्रकारचे वैयक्तिक गुन्हे प्रतिबंधित करणे किंवा टाळणे कोणत्याही पोलीस खात्याला शक्य होत नाही हे वास्तव आहे. फलटणच्या घटनेमध्ये एक पोलीस समाविष्ट असल्यामुळेच ती घटना जास्त गंभीर आहे आणि अशा प्रकारच्या घटनांमध्ये प्रकरण दडपले जाण्याची भीती असल्यामुळेच त्याला महत्त्व द्यावे लागते आणि माध्यमांनीसुद्धा त्याच भूमिकेतून हा विषय सातत्याने लावून धरला आहे. गुन्हेशास्त्रातील नियमाप्रमाणे जे गुन्हे घडत असतात ते एकतर शरीराविरुद्धचे गुन्हे असतात किंवा मालमत्तेविरुद्धचे गुन्हे असतात. म्हणजेच मारामारी, खून, बलात्कार, खुनाचा प्रयत्न हे सगळे शरीराविरुद्धचे गुन्हे असतात आणि चोरी, दरोडे हे गुन्हे मालमत्तेच्या विरोधातील गुन्हे असतात. सतत अशा प्रकारचे गुन्हे कोठे ना कोठे घडतच असतात. या गुन्ह्यांचा छडा लावून गुन्हेगारांना शिक्षा देण्यामध्ये पोलीस खाते किती सक्षम आहे यावर कायदा व सुव्यवस्था अवलंबून असते. कोणत्याही शहराच्या कानाकोपर्यात किंवा निर्जन ठिकाणी एखादा गुन्हा जर घडत असेल तर तो गुन्हा घडू नये यासाठी पोलिसांना प्रत्यक्षपणे काहीच करता येत नाही. पण गुन्हा घडून गेल्यावर संबंधितांना शिक्षा देण्यासाठी मात्र पोलिसांची भूमिका महत्त्वाची असते. फलटणच्या घटनेनंतर गृहखात्याच्या कारभारावर आणि कायदा व सुव्यवस्थेच्या विषयावर जरी बोट ठेवण्यात आले असले, तरी या प्रकरणाचा व्यवस्थित तपास झाला नाही आणि गुन्हेगारांना शिक्षा झाली नाही तरच गृहखात्याला जबाबदार धरणे योग्य ठरू शकते. एखाद्या शहरात सातत्याने चोर्यामार्यांचे प्रमाण वाढले असेल, दरोडे वाढले असतील किंवा स्त्रियांविरुद्ध गुन्ह्यांचे प्रमाण वाढले असेल तर पोलिसांची अकार्यक्षमता लक्षात घेता येऊ शकते आणि पोलिसांचा वचक नाही असे म्हणता येऊ शकते. म्हणून पोलिसांनी आपला वचक निर्माण करणेसुद्धा महत्त्वाचे असते. गुन्हेगारांच्या मनात पोलीस खात्याबाबत आणि न्यायव्यवस्थेबद्दल वचक नसेल तर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत जाते. फलटणची घटना असो किंवा इतर काही हिंसक गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना असो, त्याला जबाबदार असणार्या गुन्हेगारांना जोपर्यंत शिक्षा होत नाही तोपर्यंत कायदा व सुव्यवस्थेचे व्यवस्थित पालन झाले आहे असे म्हणता येत नाही. फलटणच्या घटनेमध्ये तर थेट पोलीसच सहभागी असल्याने या प्रकरणाचा अत्यंत गांभीर्याने आणि काळजीपूर्वक तपास करून गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा देण्याचे काम पोलीस व्यवस्थेला करावेच लागणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे एखादा गुन्हा घडण्यास नक्की कारण काय याचा विचार अनेक वेळा केला जातो. फलटणच्या घटनेमध्ये सुद्धा या आत्महत्याच्या घटनेचे कारण काय असावे याबाबत उलट सुलट दावे करून संबंधित महिलेचे चारित्र्यहनन करण्याचाही प्रयत्न केला जात आहे.

## घरकुल लाभार्थ्यांना शासकीय जागा तात्काळ नियमानुकुल करून द्या

रिसोड : तालुक्यात सर्वच गावांमध्ये गरजू लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले आहे परंतु अनेक लाभार्थी मालकीचे जागा नसल्यामुळे त्यांना दुसरा हप्ता देण्याची सुरुवात केली नाही हे सर्व लाभार्थी अनेक वर्षापासून शासकीय जागेमध्ये साधे बांधकाम करून वास्तव करीत आहे त्या जागेमध्ये शासनाने घरकुल लाभार्थी निवडताना जिओ टाकींग सुद्धा केलेली आहे.

अनेक वर्षापासून हे सर्व लाभार्थी आपल्याला घरकुल मिळणार अशी आशा लावून आहेत सर्व नियमाचे पूर्तता करून सर्व पद्धतीची छाननी करून हे सर्व लाभार्थी घरकुलामध्ये बसलेले आहेत तरीसुद्धा ते लाभा पासून वंचित आहे कारण त्या लाभार्थ्याजवळ मालकीची जागा नाही शासनाने अशा सर्व लाभार्थ्यांना ते ज्या जागेवर अतिक्रमण करून राहतात अशा सर्व जागा नियमाकुल करून त्यांना आठ देऊन घरकुलाचा लाभ देण्यात यावा असे शासनाचे



नियम असून सुद्धा ग्रामपंचायत व पंचायत समिती प्रशासनाने यांची अंमलबजावणी केली नाही या आधी सुद्धा या विषयावर निवेदन देण्यात आले . गटविकास अधिकारी यांनी निवेदनाची दखल घेतली नाही म्हणून आज रोजी परत आपल्याला निवेदन देण्यात येत आहे की या सर्व लाभार्थ्यांना तात्काळ त्या शासकीय जागेची नियमाकुल साठी प्रस्ताव तयार करून मान्यता घ्यावी व लाभार्थ्यांचे राहिलेले सर्व हप्ते तात्काळ देण्यात यावे असे माजी उपसभापती सय्यद अखिल यांनी गटविकास अधिकारी यांना सांगितले तसेच मालकीच्या ज्यांच्याजवळ आठ आहे अशा लाभार्थ्यांचे हफ्ते पंचायत समिती मार्फत मिळत नाही आपण पंचायत समिती येथे आले तेव्हापासून लाभार्थ्यांची व आपली ऑफिसला भेट सुद्धा होत नाही आपला फोन सुद्धा लागत नाही हे लाभार्थ्यावर अन्याय करणारे हरकत आपली दिसत आहे त्यामुळे नाराजी वेक्त सय्यद अखिल यांनी गटविकास अधिकारी साहेब यांना व्यक्त केली इतर कामांना येणारे लाभार्थी आपल्या प्रशासनावर नाराजी व्यक्त करत आहे तरी या सर्व मुद्दे लवकरात लवकर निकाली काढण्यात यावे अन्यथा आपल्या प्रशासनाच्या विरोधात लोकशाही मार्गाने रिसोड तालुक्याच्या शिवसेनेच्या स्टाईल मध्ये तिर्व स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा सय्यद अखिल यांनी दिले त्यांच्यासोबत आदिवासी संघटनेचे तालुका अध्यक्ष संतोष शिंदे उपस्थित होते . श.प्र.

## ‘वैदिक संस्कार ज्युनियर असिस्टंट’ अभ्यासक्रमांतर्गत तीर्थक्षेत्रातील सेवांसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ

मुंबई, दि.२०: आयटीआयमध्ये सुरु होणाऱ्या ‘वैदिक संस्कार ज्युनियर असिस्टंट’ या अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून तीर्थक्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होणार असून पुढच्या वर्षी नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्यात हजारो प्रशिक्षित युवक भाविकांच्या सेवेसाठी कार्यरत राहणार असल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली आहे. या अभ्यासक्रमाच्या माहितीबाबत ते सह्याद्री अतिथीगृह येथे पत्रकारांशी बोलत होते.

व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था (आयटीआय) तर्फे ‘वैदिक संस्कार ज्युनियर असिस्टंट’ हा विशेष अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असून, या उपक्रमाला राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा (National Skill Qualification Framework • NSQF) यांची मान्यता मिळाली आहे. या अभ्यासक्रमाच्या निमित्ताने तीर्थक्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. धार्मिक मेळ्यांमध्ये, यात्रांमध्ये आणि तीर्थक्षेत्रांवर कार्य करणाऱ्या युवकांना या माध्यमातून व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून प्रशिक्षण घेतलेले युवक भाविकांचे स्वागत, मार्गदर्शन, आरोग्य व स्वच्छता जनजागृती तसेच सामाजिक समन्वय या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील. त्याचबरोबर २०२६ह२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, लाखो भाविकांच्या उपस्थितीत धार्मिक वातावरणात शिस्तबद्ध व्यवस्थापन व सेवा पुरवण्यासाठी या अभिनव उपक्रम द्वारे कुंभमेळ्यातील भाविकांना सेवा-प्रदान करण्यासाठी अतिशय मोलाचे साहाय्य होणार असल्याची माहितीही मंत्री लोढा यांनी यावेळी दिली.विशेष म्हणजे अल्पमुदतीच्या अभ्यासक्रम कार्यक्रमांतर्गत ‘वैदिक संस्कार ज्युनियर असिस्टंट’ हा अभ्यासक्रम नाशिक जिल्ह्यात घेण्यात येणार असून कुंभमेळ्यात येणाऱ्या भाविकांचे व्यवस्थापन, मार्गदर्शन आणि सेवा कार्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे हा यामागचा उद्देश आहे. फक्त महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभरातील विविध भागात अशा स्वरूपाचे अभ्यासक्रम चालवले जात असल्याची माहिती कौशल्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यावेळी दिली.

## दक्षता जनजागृती सप्ताहादरम्यान भ्रष्टाचारविरोधी संदेश प्रसारित करण्याचे आवाहन

मुंबई, दि. २४ : केंद्रीय दक्षता आयोगामार्फत २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ दरम्यान दक्षता जनजागृती सप्ताह-२०२५ देशभर साजरा करण्यात येणार आहे. भ्रष्टाचार हा विकासकामातील सर्वात मोठा अडथळा आहे. समाजाचे होणारे नुकसान थांबवण्यासाठी दक्षता जनजागृतीसारखे उपक्रम केवळ आठवड्यापुरते न राबविता नियमित सुरु ठेवणे गरजेचे असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने म्हटले आहे. कोणीही राज्य सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी भ्रष्टाचार करताना किंवा भ्रष्टाचारात गुंतलेला आढळल्यास, त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई येथे संपर्क साधावा. किंवा संपर्क क्रमांक. २४९२१२१२, टोल फ्री क्रमांक १०६४, व्हाट्सअप क्रमांक - ८८२८२४१०६४, तसेच addicpacbmumbai mahapolice.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क साधावा. नागरिक, सरकारी-खासगी क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधासाठी सक्रिय सहकार्य करावे.

## निशांत मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी रीसोड शाखेचा वर्धापन दिन उत्साहात

रिसोड : निशांत मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी अकोला शाखा रीसोड चा तेरावा वर्धापन दिन संपन्न. रिसोड् निशांत मल्टीस्टेट को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटी लिमिटेड अकोला चे संस्थापक अध्यक्ष लोकनायक प्रकाश पोहरे व संस्थेचे अध्यक्ष आमदार रणधीरभाऊ सावरकर यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या निशांत मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड अकोला शाखा रिसोड चा तेरावा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रिसोड शाखाध्यक्ष एडवोकेट भूषण देशमुख यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून शाखा समिती सदस्य डी. के सदार , अमित पाटील खडसे, सुभाष खरात बाबुराव जाधव , मानवतकर सर संजय शिंदे यांच्यासह विभागीय



व्यवस्थापक सुरेश शिंदे उपस्थित होते यामध्ये शाखेचे दोन ठेवीदार व चांगले कर्जदार यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला सुरुवातीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले कार्यक्रमाच्या यशस्वीते करता शाखाधिकारी अरुण मोरे शाखाधिकारी जाधव डोणगाव, गोपाल गाडेकर शाखाधिकारी मेहेकर, भागवत गायकवाड शाखाधिकारी लोणार यांच्यासह कर्मचारी रवींद्र बोडखे अनिल मुळे ,सौ गीतांजली भुतेकर, सारंग राजेगावकर यांनी अथक परिश्रम घेतले

**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

